लोकमत

# ग्रामस्वच्छता अभियान, विभागीय तपासणी; ग्रामसेवक गैरहजर; अंगणवाडी, शाळाही बंद

## तपासणीविनाच पथक माघारी : कर्मचाऱ्यांसह बीडीओंना शो-कॉज

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत विभागस्तरीय तपासणीदरम्यान कारंजा तालुक्यातील गायवळ येथील ग्रामसेवकच गावात गैरहजर होते. याची गंभीर दखल घेत जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक एस. व्ही. राठोड यांच्या दोन वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात थांबवण्याचे निर्देश दिले, तर पर्यवेक्षणीय कामात हलगर्जीचा ठपका ठेवून गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड यांच्या सेवा पुस्तकेत नोंद घेण्याचेही निर्देश दिले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावलेल्या कारंजा येथील गायवळ आणि प्रथम क्रमांक पटकावलेल्या मालेगाव तालुक्यातील ढोरखेडा गावाची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकामार्फत करण्यात येत होती. त्यानुसार गुरुवार, २२ फेब्रुवारीला सकाळी नऊ वाजता अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास) राजेंद्र फडके पथकासह गायवळ या गावाची तपासणी करण्यासाठी गेले. त्यावेळी गावातील ग्रामसेवक, इतर संबंधित कर्मचारी गैरहजर आढळून आले. गावातील शाळा व अंगणवाडी केंद्रही बंद असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. या सर्व प्रक्रियेचा मुख्य भाग असलेला ग्रामसेवकच गावात हजर नसल्याने तपासणीविनाच पथकाला परत यावे लागले. गटविकास अधिकारी तोटेवाड हेसुद्धा गावात उशिरा पोहोचल्याने उपायुक्त फडके यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी विभागीय आयुक्तांच्या पथकासोबत जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशनचे संचालक जगदीश साहू व त्यांची जिल्हा टीम उपस्थित होती.

### अंगणवाडी सेविका, मदतनिसांनाही नोटीस

गायवळ येथील अंगणवाडी सेविका पदमा हरिहर जगताप व मदतनीस मंगला आनंदा इंगळे यांना नोटीस बजावण्याचे व दोषी आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिले.

### सूत्रे स्वीकारल्यानंतर सीईओची पहिलीच कारवाई

वाशिम जिल्हा परिषदेची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांची ही पहिलीच कारवाई आहे. या कारवाईमुळे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनात धडकी भरली आहे.



### मुख्याध्यापकांसह ४ शिक्षकांनाही शो कॉज

स्वच्छता अभियानाच्या तपासणीदरम्यान गायवळ येथील जिल्हा परिषद शाळा बंद होती, तसेच शाळेत एकही शिक्षक उपस्थित नसल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक भारत येवले, शिक्षक श्रीकांत सावके, शंकर धनगर, दिनेश गाडगे यांनाही कर्तव्यात कसूर केल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले.